

**परिषद :** एएसएमच्या आंतराष्ट्रीय परिषदेत डावीकडून डॉ. संतोष दास्ताने, पोलंड येथील इंडो -युरोपियन एज्युकेशन फाउंडेशनचे डॉ. प्रदीप कुमार, पोलंड येथील ॲप्लाईड सायन्स विद्यापीठाच्या प्रोफेसर झोफिया विलीमोस्का, एएसएम ग्रुपच्या सचिव सचिव डॉ. आशा पाचपांडे, अजिंक्य डीवायपाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एकनाथ खेडकर, रीसर्च सेंटर आयबीएमआरचे डॉ. संदीप पाचपांडे, निसा पोलंडचे युनिऑफ ॲप्लाइड सायन्सचे मुख्य विश्वस्त ॲना ओपालका, सेटिज युनिव्हर्सिटी मेक्सिकोचे प्रोफेसरडॉ. डोवारडो वातानाबे.

### एकनाथ खेडकर : एएसएम आंतरराष्ट्रीय परिषद

# संशोधनातून नवनिर्मिती गरजेची

पिंपरी : स्पर्धेत टिकायच असेल, तर संशोधनातून नवनिर्मिती गरजेची आहे. आपल्या देशात संशोधन करण्यासाठी संधी आहे. संशोधन झाल्यानंतरही त्यामध्ये सातत्य हवे. तसेच, संशोधन हे समाजोपयोगी असावे, असे मत येथे आयोजित एएसएम आंतराष्ट्रीय परिषदेत अजिंक्य डीवायपाटील विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. एकनाथ खेडकर यांनी व्यक्त केले.

एम्पायर इस्टेटजवळील एएसएम कॅम्पसमध्ये (एएसएम ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट) औद्योगिक शिक्षण मंडळातर्फे व्यवस्थापन व माहिती तंत्रज्ञान विषयावरील 'इंकॉन' या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि. ८ व ९ रोजी दोन दिवस करण्यात आले आहे. परिषदेत तीनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी फायनान्स, माहिती-तंत्रज्ञान, मनुष्यबळ, विपणन अभ्यास या विषयावर शोधनिबंध सादर केले. यातील काही शोधनिबंध हे परदेशातील विद्यार्थ्यांचे आहेत. यामध्ये पोलंड, मेक्सिको, यूएसएच्या नागरिकांनी सहभाग घेतला आहे. मेक्सिकोमधील सेटिस विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, अमेरिकेच्या सियाटलमधील सिटी युनिव्हर्सिटी, पोलंडमधील विस्तुला विद्यापीठ, इंडो युरोपियन यांच्या सहकार्याने ही परिषद भरविण्यात आली आहे.

या वेळी सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे व्यवस्थापनशास्त्र शाखेचे अधिष्ठाता व अजिंक्य डीवायपाटील विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. एकनाथ खेडकर, पोलंड येथील ॲप्लाईड सायन्स विद्यापीठाच्या झोफिया विलीमोस्का, सेटिज युनिव्हर्सिटी मेक्सिकोचे प्रोफेसर डॉ. डोवारडो वातानाबे, पोलंड येथील इंडो -युरोपियन एज्युकेशन फाउंडेशनचे प्रदीप कुमार, निसा पोलंडचे युनिऑफ ॲप्लाइड सायन्सचे मुख्य विश्वस्त ॲना ओपालका, रीसर्च सेंटर आयबीएमआरचे डॉ. संतोष दास्ताने, औद्योगिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप पाचपांडे, सचिव डॉ. आशा पाचपांडे उपस्थित होते.

एएसएम ग्रुपचे अध्यक्ष संदीप पाचपांडे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. रिंपल अहुजा, नीता कुचे यांनी सूत्रसंचालन केले. एएसएम ग्रुपच्या सचिव आशा पाचपांडे यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

## विद्यार्थ्यांना संधी : संशोधन करण्याची

चायना, इंडोनेशिया येथे संशोधन कमी असल्यामुळे त्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्या ठिकाणी दर्जात्मक उत्पादने नाहीत. यासाठी मोठी स्वप्ने पाहताना हृदयाचे प्रत्येक स्पंदन हे प्रेरणास्रोत व्हायला हवे. - **एकनाथ खेडकर,** कुलगुरु, अजिंक्य डी.वाय. पाटील विद्यापीठ

विद्यार्थ्यांना संशोधनासाठी मी पोलंडमध्ये आमंत्रित करीत आहे. पोलंडचा व्हिसा काढल्यानंतर २७ देशांत संशोधन करण्याची संधी आहे. आयुष्यात एखाद्या व्यवसायात नापास झाले, तरी त्या व्यवसायांच्या विचारांमध्ये नापास होता कामा नये.

- **प्रदीपकुमार,** इंडो युरोपियन एज्युकेशन फाउंडेशन